**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०८१/२०२५** **निशाणी क्र. १० वर पुढे**

## न्यायनिर्णय

**(जाहीर दिनांक – ११/०६/२०२६)**

सरकार पक्षाने दिलेला पुरावा व दोन्ही पक्षांचे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकून खालील मुद्दे माझ्यासमोर उपस्थित झाले आहेत. सदर मुद्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत –

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, **दि. २९/११/२०२५** रोजी **दुपारी ०४.१५ ते ०४.४५** वाजता अगर त्या सुमारास मौजे **सावंगी**, ता. राळेगाव, जि. यवतमाळ येथे **आरोपीच्या घराचे समोर झडती दरम्यान** आरोपीच्या ताब्यात हातातील थैलीत विना परवाना, बेकायदेशीर **गोवा संत्रा नं. १ देशी दारुचे १८० मि. लि.चे ०७** पव्वे विक्रीकामी मिळून आले व त्यानुसार आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे **कलम ६५ (ई)** नुसार शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशानुसार** |

# कारणे

## मुद्दा क्र.१ बाबत –

०२. अभियोगपक्षाने आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी **प्रफुल दिलीप चतुरकर** (साक्षीदार क्र. १) या एकमेव पंच साक्षीदाराची साक्ष नोंदवली.

०३. साक्षीदार क्र. १ – **प्रफुल दिलीप चतुरकर** या साक्षीदाराने आपल्या साक्षीमध्ये स्पष्टपणे सांगितले की, **दिनांक २९/११/२०२५** रोजी पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी कुठेही बालाविले नव्हते, त्याने पंचनाम्यावर सही असल्याचे मान्य केले, परंतु, त्यातील मजकूर त्याला माहीत नाही, असे कथन केले त्यांना दाखवण्यात आलेल्या पंचनाम्यावर त्यांची सही असली तरी, त्यातील मजकूर त्यांना पोलिसांनी वाचून दाखवला नाही, असे त्यांनी नमूद केले. विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी विचारलेल्या सूचक प्रश्नांना उत्तर देताना, साक्षीदाराने पोलिसांच्या बाजूने असलेले **सर्व महत्त्वाचे मुद्दे स्पष्टपणे नाकारले.**

०४. प्रस्तुत प्रकरणात, घटनेच्या वेळी उपस्थित असलेली एकमेव पंच साक्षीदार **प्रफुल दिलीप चतुरकर** हा पूर्णपणे फितूर झाला आहे. त्यांनी पोलिसांच्या बाजूने असलेला कोणताही महत्त्वाचा पुरावा किंवा त्यांची उपस्थिती मान्य केली नाही. त्यांनी घटनास्थळी त्यांची उपस्थिती, आरोपीच्या ताब्यातून **देशी दारू जप्त** करण्याची प्रक्रिया किंवा पंचनाम्यातील मजकूर यापैकी कशालाही दुजोरा दिलेला नाही. पंचनाम्यावर त्यांची सही असली तरी, त्यातील मजकूर त्यांना माहीत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायद्याखालील गुन्हा सिद्ध करण्यासाठी, आरोपीच्या ताब्यातून अवैध देशी दारू जप्त करण्यात आली हे सिद्ध करणे आवश्यक आहे. हे सिद्ध करण्यासाठी स्वतंत्र साक्षीदारांचा पुरावा महत्त्वाचा ठरतो. या प्रकरणात, एकमेव पंच साक्षीदाराने संपूर्ण सरकारी पक्षाच्या कथनाचे खंडन केले आहे. त्यांच्या साक्षीवरून आरोपीने कोणताही गुन्हा केल्याचे सिद्ध होत नाही. न्यायालयासमोर सादर केलेला पुरावा आरोपीला दोषी ठरवण्यासाठी

अपुरा आणि विसंगत आहे. केवळ पंचनाम्यावर सह्या असणे पुरेसे नाही, जोपर्यंत पंच त्या पंचनाम्यातील **मजकुराला आणि प्रक्रियेला दुजोरा देत नाहीत.**

०५. पंच साक्षीदाराचा पुरावा नोंदवल्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाचे पुराव्यामध्ये आरोपीचा गुन्ह्याशी संबंध दर्शविणारा पुरावा आला नसल्यामुळे आरोपीचे **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३५१** प्रमाणे निवेदन नोंदवण्यात आले नाही.

०६. उपरोक्त विवेचन आणि पुराव्याच्या कमतरतेच्या आधारे, हे न्यायालय या निष्कर्षावर पोहोचले आहे की, अभियोगप पक्ष आरोपीविरुद्ध लावलेला **गुन्हा सिद्ध** करण्यात पूर्णपणे **अयशस्वी** ठरले आहे. आरोपीविरुद्ध कोणताही ठोस आणि विश्वसनीय पुरावा उपलब्ध नाही.

०७. अभियोग पक्षास वारंवार संधी देऊन देखील वरील साक्षीदाराव्यतिरिक्त इतर कोणतेही साक्षीदार तपासलेले नाहीत. घटनास्थळ/जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार क्र. १ यांनी अभियोग पक्षास समर्थनीय पुरावा दिलेला नाही. तसेच आरोपीचे ताब्यातून मुद्देमाल जप्त केल्याबाबत अभिलेखावर पुरावा आलेला नसून अभियोगपक्षाने **रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सुध्दा दाखल केलेला नाही.** या सर्व कारणांमुळे जप्त मुद्देमाल आरोपीचे ताब्यातून जप्त केला, हे शाबीत होऊ शकले नाही. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम **कलम ६५(ई)** अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने वाजवी संशयापलीकडे शाबीत केले नाही, असे माझे मत आहे.

०८. वरील चर्चेअंती, मी या निष्कर्षास आलो आहे की, आरोपीवरील दोषारोप अभियोग पक्ष सिध्द करु शकलेला नाही. **म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.**

**मुद्दा क्र. २ करीता** –

०९. फौजदारी खटल्यामध्ये आरोपीचा गुन्हा शंकेच्या बाहेर जाऊन शाबीत करणे अभियोग पक्षावर बंधनकारक आहे. मात्र अभियोग पक्षाच्या एकंदरीत पुराव्यात आरोपीविरुध्द गुन्हादर्शक असा कोणताही पुरावा आलेला नाही. त्यामुळे आरोपीला निर्दोष सोडणे न्यायोचित होईल. **सबब, मुद्दा क्र. २ साठी मी खालील आदेश पारित करीत आहे –**

**आदेश**

१. आरोपी **अनिल विठ्ठलराव लिंगणवार** यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे **कलम २७८(१)** नुसार महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम **कलम ६५(ई)** खालील गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने नागरिक सुरक्षा संहिता २०२३ **चे कलम ४८१** चे पुर्ततेकामी रक्कम **रु.१५,०००/–** चा वैयक्तिक जातमुचलका व जामीन बंधपत्र सादर करावे.

४. प्रस्तुत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला मुद्देमाल आव्हान कालावधी संपल्यानंतर **आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ** यांचेकडे पुढील कार्यवाहिस्तव पाठविणेत यावा.

**( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PATIL UMESHCHANDRA MADHAVRAO
Date: 2026.06.11 17:22:55 +0530

**स्थळ** – राळेगाव

**दिनांक – ११/०६/२०२६**

**(यु. एम. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, राळेगाव.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

a) **Name of the Stenographer** :- R. R. Hardiya.

b) **Court** :- Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Ralegaon.